# <u>जिल्हा निवड समिती गोंदिया</u>

## गोंदिया जिल्हा परीषद अंतर्गत पदभरती-२०१५

जाहीरात क्रंमाक/जिपगो/साप्रवि/आस्था/का-५/कावि/२४२८/२०१५ दिनांक ०२ नोव्हेबर २०१५

---

ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परीपत्रक क्रंमाक/एपीटी-२०१४/प्र.क्रं.१३९/ आस्था-८ दिनांक २१ एप्रिल २०१५ व वित्त विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रंमाक/संकीर्ण-२०१५/प्र.क्रं. २०१५/प्र.क्रं.४१/अर्थ-१ दिनांक ०२ जुन २०१५ मधील (ब) व (क) मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परीपत्रक क्रंमाक/एपीटी-२०१४/प्र.क्रं.१३९/आस्था-८ दिनांक ८ ऑक्टोबर २०१५ तसेच ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परीपत्रक क्रंमाक/एपीटी-२०१४/प्र.क्रं.१३९/आस्था-८ दिनांक १५ ऑक्टोबर २०१५ अन्वये गोंदिया जिल्हा परीषद अंतर्गत सरळसेवेने भरावयाच्या गट-क च्या पदाकरीता पात्र उमेदवाराकडुन ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज **zpgondiabharati.in** या संकतेस्थळावर **दिनांक ०२.११.२०१५ ते १८.११.२०१५ पर्यत** मागविण्यांत येत आहे. **Online** व्यतिरीक्त इतर पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी. जाहीरात, अर्जाचा नमुना व सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहे तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची तारीख** | सोमवार दिनांक ०२.११.२०१५ पासुन |
| **ऑनलाईन चालान डाऊनलोड करण्यांची शेवटची तारीख** | सोमवार दिनांक १६.११.२०१५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| **ऑनलाईन अर्ज भरण्यांची शेवटची तारीख** | बुधवार दिनांक १८.११.२०१५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| **परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यांची तारीख** | परीक्षेच्या तीन दिवस आधीपासुन संकेतस्थळावर सुरु राहील |

**<u>टिप :-</u>** कोणीही व्यक्ती कार्यालयाशी थेट संपर्क साधु नये. कोणत्याही माहीतीकरीता सामान्य प्रशासन विभाग, जि.प. गोंदिया येथील कार्यालयीन दुरध्वनी क्रंमाक **०७१८२-२३६१५५** वर संपर्क करावे. (कार्यालयीन वेळ **सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.००** वाजेपर्यत)

**<u>२.आरक्षणानुसार भरावयाचा पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.</u>**

| अ.क्रं. | पदाचे नांव / वर्ग व वेतनश्रेणी | भरावयाची रिक्त पद संख्या | प्रवर्ग निहाय भरावयाची पदे | | **समांतर आरक्षण** | | | | | | | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महिला | अपंग | माजी सैनिक | खेळाडु | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | पदवीधर अंशकालीन | |
| १ | वरीष्ठ सहाय्यक (लेखा) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) तृतीय श्रेणी ५२००-२०२००/- ग्रेड वेतन २४००/- | **१** | अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | औषध निर्माण अधिकारी जिल्हा सेवा (वर्ग-३) (दुय्यम आरोग्य) प्रथम श्रेणी ५२००-२०२००/-ग्रेड वेतन २८००/- | **१** | नि:समर्थ असलेली व्यक्ती (Persons with Disabilities) अस्थिव्यंग | | | | | | | | | |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचा-यांमधुन जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (आरोग्य) श्रेणी तीन ५२००-२०२००/-ग्रेड वेतन २४००/- | **६** | अ.जा. | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | विजा अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | आरोग्य सेविका (महिला) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (आरोग्य) श्रेणी तीन रु. ५२००-२०२००/-ग्रेड वेतन २४००/- **(केवळ महिला उमेदवारांकरीता)** | **३७** | अ.जा. | ५ | ० | अस्थिव्यंग OL *४ पदे | १ | २ | ० | ० | १ | १ |
| | | | अ.ज. | ३ | ० | | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| | | | विजा अ | ४ | ० | | १ | ० | ० | ० | ० | ३ |
| | | | भज क | १ | ० | | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | भज ड | १ | ० | | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | | इमाव | ६ | ० | | १ | ० | ० | ० | १ | ४ |
| | | | खुला | १७ | ० | | ३ | १ | १ | ० | २ | १० |
| ५ | अंगणवाडी पर्यवेक्षिका **(सरळसेवा)** जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (चार) एकात्मिक बाल विकास सेवा योजना रु.9300-34800/- ग्रेड वेतन 4100/- **(केवळ महिला उमेदवारांकरीता)** | **१** | भज ब | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | अंगणवाडी पर्यवेक्षिका **(अंगणवाडी सेविकामधुन)** जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (चार) एकात्मिक बाल विकास सेवा योजना रु.9300-34800/- ग्रेड वेतन 4100/- **(केवळ महिला उमेदवारांकरीता)** | **१** | खुला | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० |

बहुजन हिताय बहुजन सुखाय गोंदिया जिल्हा परिषद

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | विस्तार अधिकारी (कृषि) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (कृषि) प्रथमश्रेणी रु.9300-34800/- ग्रेड वेतन रु.4200/- | १ | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ८ | कनिष्ठ अभियंता जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-3) (अभियांत्रिकी) व्दितीय श्रेणी रु.9300-34800/- ग्रेड वेतन 4300/- | २ | विजा अ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | | | विमाप्र | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) जिल्हा सेवा (वर्ग-3) (दुय्यम लिपीक) प्रथम श्रेणी रु.5200-20200/- ग्रेड वेतन रु.1900/- | ३ | विजा अ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भज क | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| १० | कनिष्ठ लेखा अधिकारी जिल्हा सेवा (वर्ग-3) (व्दितीय श्रेणी) रु.9300-34800/- ग्रेड वेतन रु.4200/- | १ | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ११ | कंत्राटी ग्रामसेवक (वर्ग-3) (दुय्यम कार्यकारी आणि ग्राम विस्तार) प्रथम श्रेणी रु. 6000 मानधन तत्वावर + रु.1100/- प्रवासभत्ता तसेच जिल्हा सेवेत नियमित झाल्या नंतर रु. 5200-20200/- ग्रेड वेतन 2400/- | ५ | अ.जा. | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | | | विजा अ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भज क | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | | | भज ड | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १२ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक जिल्हा सेवा (वर्ग-3) (दुय्यम अभियांत्रिकी ) प्रथम श्रेणी रु. 5200-20200/-ग्रेड वेतन .2400/- | २ | अ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| | | | इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**टिप** :- १) भरतीसाठी जाहीर केलेल्या भरावयाच्या पदांच्या संख्येत व आरक्षणात कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या व संमातर आरक्षणाबाबत बदल करण्यांचे अधिकार जिल्हा निवड समितीची राहील.

२) *मध्ये दर्शविलेले समांतर आरक्षण एकुण बेरजेमध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे एकुण बेरजेमध्ये तफावत दिसुन येते.

३) भरती प्रक्रीया जिल्हा निवड समितीच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत पारदर्शकपणे राबविण्यांत येत आहे. भरती संबंधी कोणाच्याही खोटया भुलथापांना बळी पडु नये यास जिल्हा निवड समिती जवाबदार राहणार नाही.

४) सरळसेवा भरती प्रक्रीया संदर्भातील सविस्तर जाहीरात zpgondiabharati.in, ww.zpgondia.gov.in व www. gondia.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजुन घेवुनच zpgondiabharati.in संकेतस्थळावरुन ऑनलाईन अर्ज करावा. उमेदवाराने सदर अर्ज जाहीरातीत नमुद केलेल्या पध्दतीनुसार व सुचनानुसार ऑनलाईन भरण्यांची कार्यवाही करावी. सदर भरती संबंधात वेळावेळी सुचना सदर संकतेस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल याबाबत प्रत्येक सुचना बघण्यांची संपुर्ण जवाबदारी ही सर्वस्वी उमेदवाराचीच राहील.

५) शैक्षणिक पात्रता व इतर अटी व शर्ती पुर्ण करणा-या उमेदवारानी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावे. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यांत येणार नाही. आवेदन केलेल्या पदासाठी आवश्यक पात्रता धारण न करणा-या उमेदवारास लेखी परीक्षा झाल्यानंतरही भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्यावर अप्रात्र ठरविण्यांचे अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखुन ठेवले आहे. तसेच जाहीरातीमधील कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत कोणत्याही पदाकरीता हक्क प्रस्थापित करता येणार नाही आणि याबाबत जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

स्वा/-
**(डि.बी.गावडे)**
सदस्य, जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया.

स्वा/-
**(मंगेश मोहिते)**
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी गोंदिया.

**३. सेवाभरती नियमाप्रमाणे व शासनाचे वेळोवेळी प्राप्त निर्देशान्वये पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिकअर्हता**

| अ.क्रं | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | वरीष्ठ सहाय्यक (लेखा) | १) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण करीत असतील आणि २) याबाबत लेखाशास्त्र व लेखा परीक्षा हे विषय घेवून वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्या अथवा पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गातील पदवी धारण करणाऱ्या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत किंवा स्थानिक प्राधिकरणात तिन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधी पर्यंत लेखा विषयक कामाचा पदवीनंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| २ | औषध निर्माण अधिकारी | माध्यमिक व उच्च माध्यमिक शांलात परीक्षा उत्तीर्ण आणि डिप्लोमा इन फार्मसी ( डी फॉर्म ) उत्तीर्ण, औषध शाळा अधिनियम १९४८ अन्वये नोंदणीकृत |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) (हंगामी फवारणी कर्मचा-या मधुन) | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण तसेच राष्ट्रीय मलेरीया प्रतिरोध कार्यक्रमा अंतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणुन किमान ९० दिवस कार्यरत असलेल्या हंगामी क्षेत्र कर्मचारी मधुन जिल्हा हिवताप अधिकारी यांचे प्रमाणपत्र.<br>१) हंगामी फवारणी कर्मचारी यांच्या जेष्ठता सूचीमध्ये कर्मचा-यांचे नांव असणे आवश्यक आहे २) जेष्ठता सूचीतील ज्या हंगामी फवारणी कर्मचारी यांची या कार्यालया कडुन मंजूर करण्यांत आलेल्या मनुष्यबळाच्या अधिन राहुन हंगामी फवारणी कामाकरीता नियुक्ती करण्यांत आलेली आहे अशा कर्मचा-यांचे नियुक्ती आदेशाची छांयाकित प्रत सांक्षाकित केलेली असावी ३) नियुक्ती आदेशातील कालावधीनुसार हंगामी फवारणी कर्मचारी यांचे मुळ हजेरीपत्रकाची सांक्षाकित केलेली छांयाकित प्रत असावी ४) हजेरीपत्रकातील कालावधीचे कोषागारात सादर केलेले देयकाची सांक्षाकित केलेली प्रत असावी ५) रोख नोंदवहीतील नोंदीची सांक्षाकित केलेली प्रत असावी ६) हजेरी पत्रकातील कालावधीचे वेतन घेतलेल्या वेतन पटाची छांयाकित प्रत सांक्षाकित असावी. |
| ४ | आरोग्य सेविका (महिला) | एस.एस.सी./एच.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण (विज्ञान विषय घेवुन) महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सील मुंबईचे रजिष्ट्रेशन प्रमाणपत्रासहीत १८/२४ महिण्यांचे सहाय्यक परीचारीका प्रसविका प्रशिक्षण उत्तीर्ण आणि महाराष्ट्र परिचर्या परीषदेमध्ये किंवा विदर्भ परीचर्या परीषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र ठरतील. |
| ५ | अंगणवाडी पर्यवेक्षिका (सरळसेवा) | संविधिक विद्यापीठाची खासकरुन समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण या विषयातील स्नातक ही पदवी धारण केलेला. |
| ६ | अंगणवाडी पर्यवेक्षिका (अंगणवाडी सेविकामधुन) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व १० वर्षे मानधनी सेवा झालेल्या अंगणवाडी सेविकामधुन (अखंडीत मानसेवेसह)<br>**सदर पदाकरीता गोंदिया जिल्हयातील अंगणवाडी सेविका यांनीच अर्ज करावा. ईतर जिल्हयाच्या प्रकल्पातील अंगणवाडी सेविका यांनी अर्ज करु नये.** |
| ७ | विस्तार अधिकारी (कृषि) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही अर्हता धारण केली असेल कृषि विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता आणि कृषि विषयक कामाचा अनुभव किंवा कृषि पध्दतीचे व्यवसायाचे ज्ञान व ग्रामीण जीवनाचा अनुभव असेल अशा उमेदवारांना अधिक पंसती देण्यांत येईल. |
| ८ | कनिष्ठ अभियंता | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातुन मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (३ किंवा ४ वर्षाचा पाठयक्रम). |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण १) इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा अथवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार तसेच<br>मान्यता प्राप्त वाणिज्य संस्थाचे संगणक टंकलेखन अभ्यासक्रम १) बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि.(६ महिने) २) बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी ४० श.प्र.मि.(६ महिने) ३) स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फार इन्स्ट्रक्टर्स अँड स्टुडंटस (३ महिने) |
| १० | कनिष्ठ लेखा अधिकारी | १) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण करीत असेल व २) कोणत्याही सरकारी/व्यापारी भागीदारी संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील किमान ५ वर्षे सेवेचा अनुभव. याबाबतीत लेखाशास्त्र किंवा लेखा परीक्षा हे विषय घेवून वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्यांना अधिक पसंती दिली जाईल. किंवा गणित अथवा सांख्यिकी अथवा लेखा शास्त्र व लेखा परीक्षा हे प्रमुख विषय घेवून पदव्युत्तर पदवी. कोणत्याही शासकिय कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थेतील अथवा स्थानिक प्राधिकरणातील लेखा कार्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| ११ | कंत्राटी ग्रामसेवक | १) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा समतुल्य अर्हता आणि कृषि विषयाची पदविका (दोन वर्षाचा अभ्यासक्रम) उत्तीर्ण किंवा कृषि विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारकांना प्राधान्य किंवा<br>२) उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बीएसडब्ल्यु) धारण करणारे उमेदवार. तसेच बीटेक (अॅग्रो इंजिनिअरीग) पदवीधारक आणि संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| १२ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व किमान शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची १ वर्ष मुदतीचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण किंवा आर्कीटेक्चरल डॉप्समेन (वास्तुशास्त्र आरेखक) किंवा कन्स्ट्रक्सन सुपरवाइझर (बांधकाम पर्यवेक्षक) किंवा आरेखक (स्थापत्य) दोन वर्षीय पाठयक्रम उत्तीर्ण असावा. |

**४. लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ**

ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परीपत्रक क्रमांक/एपीटी-२०१४/प्र.क्रं.१३९/ आस्था-८ दि.१५ ऑक्टोबर २०१५ अन्वये लेखी परीक्षेचे सुधारीत वेळापत्रक खालीलप्रमाणे.

| अ.क. | पदाचे नांव | लेखी परिक्षेचा दिनांक | वार | लेखी परिक्षेची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | वरीष्ठ सहाय्यक (लेखा) | २५ नोव्हेंबर २०१५ | बुधवार | सकाळी १०.०० ते ११.३० वाजता |
| २ | औषध निर्माण अधिकारी | २५ नोव्हेंबर २०१५ | बुधवार | सकाळी १०.०० ते ११.३० वाजता |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) | २५ नोव्हेंबर २०१५ | बुधवार | दुपारी २.०० ते ३.३० वाजता |
| ४ | आरोग्य सेविका (महिला) | २५ नोव्हेंबर २०१५ | बुधवार | दुपारी २.०० ते ३.३० वाजता |
| ५ | अंगणवाडी पर्यवेक्षिका | २५ नोव्हेंबर २०१५ | बुधवार | दुपारी २.०० ते ३.३० वाजता |
| ६ | विस्तार अधिकारी (कृषि) | २५ नोव्हेंबर २०१५ | बुधवार | दुपारी २.०० ते ३.३० वाजता |
| ७ | कनिष्ठ अभियंता | २८ नोव्हेंबर २०१५ | शनीवार | सकाळी १०.०० ते ११.३० वाजता |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | २८ नोव्हेंबर २०१५ | शनीवार | दुपारी २.०० ते ३.३० वाजता |
| ९ | कनिष्ठ लेखा अधिकारी | २९ नोव्हेंबर २०१५ | रविवार | दुपारी २.०० ते ३.३० वाजता |
| १० | कंत्राटी ग्रामसेवक | ०२ डिसेंबर २०१५ | बुधवार | सकाळी १०.०० ते ११.३० वाजता |
| ११ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ०२ डिसेंबर २०१५ | बुधवार | दुपारी २.०० ते ३.३० वाजता |

**५. प्रश्नपत्रिकेचा दर्जा व स्वरुपः-** ग्राम विकास विभागाचे शासन परिपत्रक क्रंमाक/एपीटी+२०१४/प्र.क्रं.१३९/आस्था-८ दिनांक ०५ जुलै २०१४ अन्वये खालीलप्रमाणे परीक्षेचे पदनिहाय प्रश्न पत्रिकेचा दर्जा व स्वरुप विषयनिहाय राहील.

| अक्र | संवर्ग | मराठी संबंधित प्रश्न | | इंग्रजी संबंधीत प्रश्न | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | बुध्दीमापक व गणित संबंधित प्रश्न | | तांत्रिक प्रश्न संबंधित प्रश्न | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| १ | वरीष्ठ सहाय्यक (लेखा) | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| २ | औषध निर्माण अधिकारी | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ४ | आरोग्य सेविका (महिला) | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ५ | अंगणवाडी पर्यवेक्षिका | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ० | ० | १०० | २०० |
| ६ | विस्तार अधिकारी (कृषि) | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ७ | कनिष्ठ अभियंता | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ० | ० | १०० | २०० |
| ९ | कनिष्ठ लेखा अधिकारी | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| १० | कंत्राटी ग्रामसेवक | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |
| ११ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | १५ | ३० | ४० | ८० | १०० | २०० |

**लेखी परीक्षेकरीता प्रश्नपत्रिकेचा दर्जा सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे राहील.**

परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचा असतील.

१) वरीष्ठ सहाय्यक लेखा :- मराठी १२ वी दर्जा, लेखा विषयक प्रश्न इतर पदवी दर्जाची परीक्षा.
२) औषध निर्माण अधिकारी :- सर्व विषय एस.एस.सी.दर्जाची परीक्षा व औषध शास्त्र संबंधी प्रश्न.
३) आरोग्य सेवक (पुरुष) :- सर्व एस.एस.सी.दर्जाची परीक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न.
४) आरोग्य सेविका (महिला) :- एस.एस.सी.दर्जाची परीक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न.
५) अंगणवाडी पर्यवेक्षिका :- मराठी १२ वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परीक्षा.
६) विस्तार अधिकारी (कृषि) :- मराठी १२ वी दर्जा, कृषि संबंधी प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा.
७) कनिष्ठ अभियंता :- सर्व विषय एस.एस.सी.दर्जा व अभियांत्रिकी पदविका दर्जाची परीक्षा.
८) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) :- सर्व विषय एस.एस.सी.दर्जाची परीक्षा.
९) कनिष्ठ लेखा अधिकारी :- मराठी १२ वी दर्जा, लेखा संबंधी व इतर प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा.
१०) कंत्राटी ग्रामसेवक :- सर्व विषय एच.एस.सी.दर्जाची परीक्षा व कृषि पदविका दर्जाचे प्रश्न.
११) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक :- एस.एस.सी.दर्जाची परीक्षा व तांत्रिक प्रश्न.

**६. परीक्षा शुल्क**

| पदाचे नांव | मागासवर्गीय उमेदवारासाठी परीक्षा शुल्क | खुल्या उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| सर्व पदासाठी | रुपये १५०/- (रु.एकशे पन्नास फक्त) | रुपये ३००/- (रु.तीनशे फक्त) |

६.१) वर दर्शविण्यांत आलेले परीक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळुन आहे. सदर परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारेच रोखीन भरणे आवश्यक आहे. याशिवाय संबंधित बॅंकेकडुन जे प्रक्रीया शुल्क आकारले जाईल, ते प्रक्रीया शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

६.२) सदर परीक्षा शुल्क ना-परतावा राहील. ते कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

६.३) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

बहुजन हिताय बहुजन सुखाय
गोंदिया जिल्हा परिषद

## ७. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यांची पध्दत

७.१ ) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यांच्या सविस्तर सुचना zpgondiabharati.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

७.२ ) प्रस्तृत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यांत येणार नाही.

७.३) पात्र उमेदवारांना ऑनलाईन अर्ज zpgondiabharati.in या संकेतस्थळाव्दारे सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

७.४) परीक्षा शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

७.५) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनुसार संपुर्ण व खरी माहीती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रृटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्यांची सर्वस्वी जवाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहीती बदलता येणार नाही.

७.६) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्यावत विहीत पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन zpgondiabharati.in या संकेतस्थळावरील सुचनेनुसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करतांना फोटोची व सहीची प्रत्येकी साईज ४० केबीपेक्षा कमी असणे आवश्यक आहे तसेच उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र (आधारकार्ड, मतदार ओळखपत्र,वाहन परवाना, पॅनकार्ड) सोबत आणणे आवश्यक आहे.

७.७) उमेदवारांची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्राच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवाराची निवड निश्चित करण्यांत येईल. सदर प्रक्रीयेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतुन बाद करण्यांत येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्यांचे अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखुन ठेवण्यांत आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७.८) उमेदवाराने zpgondiabharati.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्जातील प्राथमिक माहीती भरल्यानंतर उमेदवारास Application ID सह स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत फी भरण्यांचे चलन दोन प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत व बॅकेची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढुन त्या चलनामार्फतच उमेदवार चलनात नमुद असलेली फी स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरणा करावी व सदर शाखेकडुन चलनावर रक्कम जमा झालेबाबत Transaction ID नमुद केला जाईल. चलनाच्या दोन प्रतीपैकी उमेदवारास त्यांची स्वतःची प्रत शाखेकडुन परत देण्यांत येईल. स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क जमा केले म्हणजे लेखी परीक्षेसाठी अर्ज पात्र ठरला असे गृहीत धरण्यांत येवु नये. त्यानंतर उमेदवाराने त्याला मिळालेल्या Application ID वरुन आपला प्राथमिक अर्ज पुन्हा उघडुन अर्जातील उर्वरीत माहीती तसेच स्टेट बॅक ऑफ इंडियाचे शाखेकडुन देण्यांत आलेला Transaction ID नमुद करुन अर्ज भरल्याची प्रक्रीया पुर्ण करेल. उमेदवाराने सदर अर्जाची प्रिंट व चलन भरल्याची जिल्हा निवड समिती, गोंदियाची प्रत कागदपत्रे छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करणे बंधनकारक आहे. सदर अर्जाची व चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवारांची कागदपत्रे छाननी केली जाणार नाही.

बॅकेमध्ये ऑनलाईन चलनाव्दारे परीक्षा शुल्क जमा करणेकरीता ऑनलाईन अर्जाचा प्रथम भाग भरुन ऑनलाईन चलनाची प्रत काढलेनंतर काढलेल्या चलनाव्दारे परीक्षा शुल्क दुसरे दिवशी बॅकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये बॅकेमध्ये जमा करावे. तसेच त्यांच्या पुढील दिवशी उर्वरीत अर्ज पुर्ण करणे आवश्यक राहील.

७.९) ऑनलाईन अर्ज प्रक्रीयेच्या सर्व टप्यातील माहीती परीपुर्ण भरुन विहीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवाराची स्थिती /परीक्षा प्रवेशपत्र/ वेळापत्रक/परीक्षाकेद्र/बैठक क्रंमाक इत्यादी बाबतची माहीती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यांत येईल. यासाठी स्वंतत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देवुन भरती प्रक्रीयेच्या माहीतीबाबत अद्यावत राहण्याची जवाबदारी उमेदवाराची राहील.

७.१०) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर zpgondiabharati.in या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र विहीत नमुद कालावधीत डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाव्दारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

## ८. सर्वसाधारण शर्ती व अटी

८.१) सदरहू जाहिरातीमध्ये दर्शविलेली रिक्त पदसंख्या,प्रवर्ग व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी/जास्त झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे वा रद्द करणे, अंशतःबदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समिती गोंदिया यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत. निवड झालेल्या उमेदवारांची पदस्थापना आदीवासी/नक्षलग्रस्त भागात रिक्त पदाची स्थिती लक्षात घेता जिल्हयात कुठेही करण्यांत येईल. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत / स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेत बदल करण्यांस विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

८.२) **वयोमर्यादा : दिनांक १८.११.२०१५** रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे, मागासवर्गीयांसाठी उच्चतम वयोमर्यादा ३८ वर्ष आहे. तसेच खालील नमूद पात्र प्रवर्गातील उमेदवारांना शासन तरतूदीनुसार त्यांचे समोर दर्शविलेल्या प्रमाणे उच्च वयोमर्यादेत शिथिलता आहे.

| | | |
|---|---|---|
| ६.२.१ | अपंग उमेदवारांसाठी | :-४५ वर्षापर्यंत |
| ६.२.२ | प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी | :- ४५ वर्षापर्यंत |
| ६.२.३ | माजी सैनिक उमेदवारांसाठी | :- माजी सैनिक यांना सशस्त्र दलात झालेली सेवा अधिक ३ |

वर्षे इतका कालावधी सूट देण्यात येईल. मा.सै. (अपंग) यांच्याबाबतीत अधिकतम ४५ वर्षापर्यंत सूट देण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| ६.२.४ | पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी | :- | ४६ वर्षापर्यंत |
| ६.२.५ | खेळाडू उमेदवारांसाठी | :- | ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील |
| ६.२.६ | स्वातंत्र्य संग्राम सैनिकांचे नामनिर्देशित पाल्यसाठी | :- | ४५ वर्षापर्यंत |
| ६.२.७ | सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी उमेदवारांना | :- | ४५ वर्षापर्यंत |
| ६.२.८ | सन १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्रशिक्षण शासकीय तांत्रिक संस्थेकडुन घेण्यांत येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची १ वर्षे मुदतीची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण केली असेल तर | :- | ४७ वर्षापर्यंत |
| ६.२.९ | अंगणवाडी पर्यवेक्षिका (अंगणवाडी सेविकामधुन) | :- | ५५ वर्षापर्यंत |
| ६.२.१० | आरोग्य सेवक (पुरुष) पदासाठी हंगामी क्षेत्र कर्मचा-यांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा | :- | ४५ वर्षापर्यंत |
| ६.२.११ | आरोग्य सेवक (महिला) उमेदवारासाठी | :- | ४० वर्षापर्यंत |
| ६.२.१२ | आधीपासुन जिल्हा परीषदेच्या सेवेत असलेल्या कर्मचा-यांचे बाबतीत. | :- | ४५ वर्षापर्यंत |

## ९. पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती अटी व शर्ती

९.१) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्र तसेच अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. परंतु ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहीती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रृटी राहील्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्यांची सर्वस्वी जवाबदारी उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना खोटी किंवा विसंगत/दिशाभूल माहीती भरलेचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवारावर फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत येईल.

९.२) उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्राचे पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे हया परीक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतिम निवड करण्यांत येईल.

९.३) गुणवत्ता यादीमध्ये येणा-या उमेदवारांना मुळ कागदपत्राची तपासणी करणेकरीता बोलाविण्यांत येईल. उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीच्या वेळी मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती प्रमाणपत्रामध्ये त्रृटी आढळल्यास अथवा माहीती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

९.४) उक्त पदांसाठी छाननी न करता जाहीरातीनुसार परीपूर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा सांकेताक क्रंमाक, वेळ व दिनांक इत्यादी तपशिल zpgondiabharati.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र zpgondiabharati.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जवाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

९.५) लेखी परीक्षेसाठी व मुळ कागदपत्राच्या छाननीसाठी उमेदवारांस स्वखर्चाने यावे लागेल.

९.६) वरील पदांसाठी स्वंतत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक आहे.

## १०. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीचे वेळी खालील मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षाकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१) शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र (गुणपत्रिका) १० वी/१२ वी/पदवी/पदव्युत्तर, व्यावसाईक प्रमाणपत्र

१०.२) पदास आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतची प्रमाणपत्रे / गुणपत्रके

१०.३) वयासंबंधी दाखला (जन्माचा दाखला/शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र)

१०.४) जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र

१०.५) महाराष्ट्र राज्यातील रहीवाशी असलेबाबत अधिवास प्रमाणपत्र

१०.६) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेवु इच्छिणा-या उमेदवारांसाठी तसेच महीला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-याने दिलेले सन २०१५-२०१६ याठी वैद्य असलेले (अर्थात दिनांक ०१.०४.२०१५ पासुन अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदरचे अर्जदार सन २०१५-२०१६ साठी वैद्य असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत तर त्यांना संबंधित आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही. जर उमेदवाराने खुल्या प्रवर्गाकरिता असलेले परिक्षा शुल्क भरले असेल तर त्याचा अर्ज खुल्या प्रवर्गासाठी ग्राहय धरल्या जाईल.

१०.७) अपंगत्वाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील (जिल्हा शल्यचिकीत्सक/वैद्यकीय मंडळ) (शासन निर्णय १४ जानेवारी २०११ अन्वये अपंगत्वाचे प्रमाणपत्र किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे.)

१०.८) सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. अनुभव प्रमाणपत्र (मोघम नको) संस्थेचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांकासह.

१०.९) शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे नाहरकत पत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१०) जिल्हा रोजगार व स्वयरोजगार कार्यालयात अथवा अन्य तत्सम शासकीय / निमशासकीय प्राधिका-याकडे रोजगारासाठी नांव नोंदणी केली असल्यास नांव नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.

१०.११) अपंग/भुंकपग्रस्त/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक/अंशकालीन बेरोजगार कर्मचारी/१९९१ चे जनगणना कर्मचारी/हंगामी क्षेत्र कर्मचारी/स्वांतत्र्य संग्राम सैनिकाचे पाल्य उमेदवाराबाबत सक्षम प्राधिका-याचा दाखला.

१०.१२) खेळाडु म्हणुन लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवाराबाबत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रिडा स्पर्धात वैयक्तिक/ सांघिक स्पर्धेत प्रथम/व्दितीय/तृतीय क्रमांकाचे किंवा सुवर्ण पदक/रौप्य पदक/कांस्य पदक यापैकी पदक/पारीतोषिक मिळालेबाबत प्रमाणपत्र.

१०.१३) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसुचना क्रमाक/एसआरव्ही-२०००/प्र.क्रं.१२७/(२०००)/१२ दिनांक २८.०३.२००५ व शासन परीपत्रक क्रमाक/एसआरव्ही-२०००/प्र.क्रं.१७/२०००/१२ दिनांक १ जुलै २००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र विवाहीत/अविवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे. विहीत नमुना zpgondiabharati.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१०.१४) विवाहीत स्त्रियांच्या बाबतीत नावांत बदल झाला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र यांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे.

१०.१५) माजी सैनिक उमेदवारांनी डिसचार्ज बुकाची मुळप्रत सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१६) अंशकालीन उमेदवाराने शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१७) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रंमाक/राक्रिधो-२००२/प्र.कं.६८/क्रियुसे-२ दिनांक ३०.०४.२००५ च्या तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडु उमेदवाराने त्याबाबतची क्रिडा/खेळ विषयक प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१८) जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात अथवा अन्य तत्सम शासकीय / निमशासकीय प्राधिका-याकडे रोजगारासाठी नांव नोंदणी केली असल्यास नांव नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.

## ११. इतर महत्वाचा सुचना

११.१) अर्जदार भारताचा नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा. त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे तसेच महाराष्ट्र राज्यातील रहीवाशी असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

११.२) सदर पदासाठी विहित केलेल्या नमुन्यात ऑनलाईन अर्ज करावे लागेल.

११.३) **आरोग्य सेविका (महिला), अंगणवाडी पर्यवेक्षिका (सरळसेवा) व अंगणवाडी पर्यवेक्षिका (अंगणवाडी सेविकामधुन) या पदाकरीता फक्त महिला उमेदवारानीच अर्ज करावे.**

११.४) वेगवेगळया पदासाठी वेगवेगळा अर्ज करावा लागेल. परंतू एकाच वेळेस वेगवेगळया पदाची परीक्षा आली तर एकाच पदाच्या परीक्षेसाठी उमेदवाराला स्वच्छेने बसता येईल.

११.५) महाराष्ट्र राज्य लोकसेवा निरधिसुचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-८) मधील अधिनियमातील नियम क्रमांक ४ (२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलिअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच, महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक/८२/२००१/मसेआ-००/प्र.क्र.४१५/का-२ दिनांक २५ मे २००१ मधील तरतूदी नुसार महिला करीता राखीव असलेल्या पदाचा फायदा घ्यावयाचा आहे त्या महिलांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.

११.६) उमेदवाराने यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे)/एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालय व जिल्हा पुनर्वसन कार्यालय येथे नोंदविले असेल तरी त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जासोबत सक्षम प्राधिका-याने दिलेले सैनिकी सेवे संदर्भातील प्रमाणपत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अनुषंगिक सवलती मिळण्यास पात्र होणार नाही.

११.७) शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांचे परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी. परवानगी शिवाय सादर केलेल्या अर्जाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार नाही व तसे आढळल्यास त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

११.८) अनुभवाच्या बाबतीत सा.प्र.वि., शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२ दिनांक ३.७.२००४ अन्वये तासिका, नियतकालीक, अंशकालीन, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

११.९) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक/रिक्रिधो/२००२/प्र.क्र६८/क्रियूसे-२ दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतूदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत शिथिलता राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत, प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. गट क पदासाठी त्या-त्या खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघीक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्य पद स्पर्धेत प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू. राज्य अजिंक्य पद स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजीत केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनने स्वतः आयोजीत केलेल्या असाव्यात. तसेच ज्या खेळाची नोंदणीकृत राज्य संघटना त्यांच्या अधिकृत राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असेल, तसेच सदर राष्ट्रीय संघटनेला इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनने संलग्नता दिलेली असल्यास, अशा राज्य संघटनेच्या स्पर्धेतील राज्य स्तरीय विजेत्यांनाही खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्यात येईल. किमान प्रविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य आहे. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रितरित्या स्पर्धा मध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही. तसेच राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती. क्रिडा विषयक प्रमाणपत्राच्या आधारे निवड झालेल्या उमेदवाराबांबत मा.संचालक, क्रिडा व युवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी क्रिडा विषयक प्रमाणपत्र वैध ठरविल्यानंतरच उमेदवारास नियुक्ती देण्यांत येईल. क्रिडा विषयक प्रमाणपत्र अवैद्य ठरविल्यास झालेली निवड आपोआप संपुष्टात (रदद) येईल.

११.१०) एखाद्या उमेदवाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

११.११) विहित अर्हता व वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथील केली जाणार नाही. जाहिरातीच्या दिनांकास विहित अर्हता व वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.

११.१२) उमेदवारांना लेखी / व्यावसायिक परीक्षेस तसेच मुळ कागदपत्राच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. उपस्थित राहील्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही

११.१३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९/१०/२००७ च्या आदेशातील परिच्छेद क्र ५(२) अन्वये लेखी परीक्षेत उमेदवार गुणवत्ता पात्र ठरण्यासाठी किमान गुण ४५ टक्के असणे बंधनकारक राहील.जे उमेदवार ४५ टक्के व यापेक्षा अधिक गुण प्राप्त करतील अशाच उमेदवारांना नियुक्तीसाठी गुणवत्तेनुसार पात्र ठरविण्यात येईल.

११.१४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-प्रशिक्षण/प्र.क्र-६१/२००१/३९ दिनांक १९.३.२००३ नूसार गट क मध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे अनिवार्य राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

११.१५) कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार,पदाची संख्या, समांतर आरक्षणाबाबत बदल करणे,परिक्षा स्थगीत करणे वा रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा परिषद प्रशासनाने राखुन ठेवले आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

११.१६) निवडणूक व नैसर्गिक आपत्ती या कारणामुळे विहित दिवशी लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर सोयीच्या अन्य दिवशी लेखी परीक्षा घेण्याबाबतचे अधिकार जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष यांना राहील.

११.१७) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहीती/ अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परीक्षेबाबतच्या सुचनाच्या अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यांत येईल व ती सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील.

११.१८) या जाहीरातीतील नमुद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय,शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परीपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

११.१९) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६- व दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागासवर्गीय प्रवर्गात उमेदवारांची निवड झाल्यास अशा उमेदवारास तात्पुरत्या नियुक्तीपासुन ६ महिण्याचे आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच नियुक्ती चारीत्र्य पडताळणी तपासणीचे अधिन राहील.

११.२०) लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेबाबत काही आक्षेप असल्यास शासन परिपत्रक दिनांक १९.४.२००७,१९.३.२००८ व २७.६.२००८ च्या तरतुदीनुसार निकालात काढण्यात येईल.

११.२१) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.२२) अपंगाची आरक्षित पदे शासन निर्णय दिनांक १९.१०.२००७ व १९.३.२०१० नुसार अपंग उमेदवारांची निवड झाल्यानंतर ते त्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्यांना त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणुन सामावुन घेण्यात येईल. शासन निर्णय १४ जानेवारी २०११ अन्वये पात्र उमेदवारास शारीरिक पात्रतेसंदर्भात विहित केलेल्या वैद्यकीय मंडळाने प्रमाणीत केल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

११.२३) खेळाडु/महिला/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/पदवीधर-अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदासाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन समांतर आरक्षण विरहीत पात्र उमेदवारामधुन गुणवत्तेनुसार निवड करणेचा विचार होऊ शकेल याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा निवड समितीचा असेल तसेच समांतर आरक्षणा अंतर्गत महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारामधुन पद भरण्यांत येईल.

११.२४) फक्त जाहीरातीला अनुसरुन ज्या उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत यांची कृपया नोंद घ्यावी.

११.२५) शासन निर्णय वित्त विभाग अनियो-१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये दिनांक १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसाठी नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

११.२६) भरती प्रक्रीयेसंबधी देण्यांत येणा-या सुधारीत व अद्यावत सुचना कार्यालयीन फलकावर तसेच www.zpgondia.gov.in या सांकेतीक स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

११.२७) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटूबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये अर्जदार विवाहित असेल तर अर्जदाराच्या हयात मुलापैकी दिनांक २८ मार्च २००६ नंतर तिस-या किंवा त्यानंतरच्या अपत्याचा जन्म झालेला नसावा.

११.२८) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

११.२९) उक्त जाहीरातीमध्ये घोषित केलेल्या पदांकरीता उमेदवाराने लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणाची प्रथम अंतरीम निवड यादी प्रसिध्द करण्यांत येईल. मुळ कागदपत्राची छाननी अंती व आक्षेप/हरकतीचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यांत येईल.

११.३०) परीक्षेचा निकाल तयार करतांना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रंमाक/प्रानिमं-१२१५/प्र.क्रं.५५/१५/१३-अ दिनांक ५ ऑक्टोबर २०१५ मध्ये नमुद निकषावर क्रमवार लावला जाईल.

११.३१) समांतर आरक्षणाअंतर्गत निवड झालेले उमेदवारांनी यापुर्वी समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेला नाही असे संबंधित विभागाकडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच नेमणुकीचे आदेश देण्यांत येईल.

११.३२) माजी सैनिक या समांतर आरक्षणात लेखी परीक्षेअंती पात्र माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबधित जिल्हा सैनिक कार्यालय व राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडुन नाहरकत दाखल प्राप्त झाला तरच सदरची पदे त्याच सामाजिक आरक्षणातील / प्रवर्गातील इतर उमेदवारामधुन भरण्यांत येतील.

११.३३) अपग उमेदवारास लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा ज्या उमेदवारांनी अर्जात लेखनिकाची मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पुरविला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

बहुजन हिताय बहुजन सुखाय
गोंदिया जिल्हा परिषद

**१२. निवडसुची व तिची कालमर्यादा**

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमाक/प्रानिमं-२००७/प्रक्र४६/०७/१३-अ दिनांक २७ जुन २००८ अन्वये उमेदवारांची अंतिम निवड सुची व तीची कालमर्यादा दिलेल्या सुचनाच्या निर्देशाप्रमाणे राहील.

**१३. उमेदवाराची अंतरीम यादी व अंतिम निवड यादी**

मुळ कागदपत्राचे छाननीसह संपुर्ण निवड प्रक्रीया लेखी परीक्षेच्या दिनांकापासुन पाच दिवसात (कार्यालयीन सुटटीचे दिवस वगळुन) पुर्ण होणे अपेक्षित असल्याने मुळ कागदपत्र तपासणीचा दिनांक व मुळ कागदपत्र तपासणीसाठी पात्र उमेदवाराची यादी जिल्हा परीषद गोंदिया आणि जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे प्रसिध्द करण्यांत येईल. त्याचप्रमाणे zpgondiabharati.in, ww.zpgondia.gov.in या संकतेस्थळावर व गोंदिया जिल्हयाचे संकेतस्थळ www.gondia.nic.in यावर प्रदर्शित केली जाईल. कोणत्याही उमेदवाराला मुळ कागदपत्र तपासणीबाबत वैयक्तिक पत्राव्दारे कळविले जाणार नाही. त्यामुळे मुळ कागदपत्र तपासणीचा दिनांक व मुळ कागदपत्र तपासणीसाठी पात्र उमेदवाराची यादी जाणुन घेणे ही उमेदवाराची वैयक्तिक जवाबदारी राहील. मुळ कागदपत्राचे तपासणी अंती लेखी परीक्षेमध्ये उमेदवारानी प्राप्त केलेल्या गुणाच्याआधारे आणि पदाचे सामाजिक,समांतर आरक्षण विचारात घेवुन अंतिम निवड यादी तयार करण्यांत येईल.

**१४. विशेष सुचना**

१४.१ पदभरतीकरीता अर्जातील सर्व माहीती खरी व अचुक भरण्यांची सर्व जवाबदारी ही संबंधित उमेदवाराची राहील. अर्जातील माहीती चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार निवडप्रक्रीयेत जरी पात्र ठरल्यास त्यांची अंतिम निवड रदद करण्यांत येईल यांची सर्व उमेदवारानी नोंद घ्यावी.

१४.२ लेखी परीक्षेची उत्तरपत्रिका तपासणी OMR मशीनव्दारे करावयाची असल्याने उमेदवाराने उत्तरपत्रिका सोडविण्याकरीता काळया शाईच्या बालपेनचाच वापर करावा. ऑनलाईन अर्ज सादर करणा-या उमेदवारांना परीक्षेकरीता फक्त तात्पुरता प्रवेश देण्यांत येईल. अंतिम निवड ही मुळ प्रमाणपत्र पडताळणी व लेखी परीक्षेतील गुण या आधारे केली जाईल.

१४.३_ सदर भरती संबंधीची जाहीरात, पदभरती कार्यक्रमासंबंधात पात्र/अपात्र उमेदवाराची यादी, उमेदवाराची अंतरिम यादी, अंतिम निवड यादी, कार्यक्रमात वेळोवेळी झालेले बदल जिल्हा परीषद कार्यालयाचे मुख्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय कार्यालयात जाहीर सुचना लावुन त्याप्रमाणे zpgondiabharati.in, ww.zpgondia.gov.in व www.gondia.nic.in या संकेतस्थळावर प्रदर्शित केले जातील.

| | |
|---|---|
| **स्वा/-** | **स्वा/-** |
| **(डि.बी.गावडे)** | **(मंगेश मोहिते)** |
| सदस्य, जिल्हा निवड समिती तथा | अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा |
| मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया | जिल्हाधिकारी गोंदिया |

**प्रतिज्ञापत्र**

मी ,असे प्रमाणित करतो /करते की,आपले कार्यालयाकरिता ---------------- ची पदे भरण्यासंबधी जाहीरात मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहीरातील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

तसेच वरील अर्जात दिलेली माहीती खरी असून त्याचे पृष्ठर्थ मी प्रमाणपत्राच्या सांक्षाकित सत्यप्रती सोबत जोडल्या आहेत.वर नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास माझी या पदाकरिता उमेदवारी रदद होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे.याबाबत नियुक्ती अधिका-यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ :-

दिनांक :-

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना -अ**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना-अ ( नियम ४पहा )**

मी, श्री/श्रीमती /कु. ------------------------------------------------------------ श्री ------------------------- यांचा / यांची मुलगा/मुलगी /पत्नी, वय -------------- वर्ष राहणार ---------याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो /करते की,

१) मी ---------------------------------------------- या पदासाठी अर्ज सादर केलेला आहे.

२) आज रोजी मला ---------- इतकी हयात मुले आहेत.त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे. (असल्यास जन्म व दिनांक नमुद करावा)

३) हयात असलेली मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अर्नह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

स्थळ-

दिनांक -

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**( अविवाहीत उमेदवारांनी नमुना अ प्रतिक्षापत्र लागु नाही, असे नमुद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. स्वाक्षरी नसल्यास अर्ज अपुर्ण आहे असे समजून रदद ठरविण्यांत येईल.**

बहुजन हिताय बहुजन सुखाय

गोंदिया जिल्हा परिषद